# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३५ वा गुरूवार दि.०७ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मांजराकडून शेतकऱ्याची लूट हेच साहेबांचे स्वप्न आहे का? भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा सवाल





लातूर :– साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्याची आडवणूक आणि पिळवणूक वर्षानुवर्ष सुरू असून मापात पाप, भावात पाप, तोडणीत पाप केले जात आहे. हेच स्वर्गीय विलासरावजी देशमुख साहेबांची स्वप्न आहे का? असा प्रश्न उपस्थित करून साखर कारखाने देशमुखांची जहागिरी नाही तर शेतकरी सभासदांच्या मालकीचे आहेत निष्क्रिय आमदाराविरुद्ध शेतकऱ्यासह जनतेत प्रचंड नाराजगी असल्याने लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून परिवर्तन घडून आणण्याचा निर्धार मतदारांनी केला असल्याचे केला असल्याचे महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे वांजरखेडा, सारसा, टाकळगाव, कानडीबोरगाव, मुरुड अकोला, गातेगाव, आखरवाई, भोईसमुद्रा, चिंचोलीरावावाडी चिंचोलीराव, शिऊर, टाकळी, बोपला, चाटा, भोयरा, अंकोली, रामेगाव, गोंदेगाव, चिंचोली, शिराळा, पिंपरी, येळी यासह विविध गावात प्रचार दौरा करून मतदाराशी संवाद साधला. भाजपा शासनाच्या वतीने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, शेतकरी सन्मान योजना, महिलांना प्रवासात सवलत, शेतीचे विजबिल माफ, आरोग्य सुविधा यासह विविध योजनांची माहिती देऊन गावा गावात वाडी वस्तीत केलेल्या लाखो रुपये खर्चाच्या विकास कामाची माहिती सांगितली. प्रत्येक ठिकाणच्या प्रचार कार्यक्रमास मतदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला यात महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आ. कराड यांच्या समवेत प्रचार दौऱ्यात भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, भाजपाचे नवनाथ भोसले, अनिल भिसे, बन्सी भिसे, वैभव सापसोड, विजय काळे, सुरज शिंदे, साहेबराव मुळे, संभाजी वायाळ, धनराज शिंदे, समाधान आडगळे, विश्वास कावळे, काशिनाथ ढगे, ज्ञानेश्वर जुगल यांच्यासह अनेक जण होते.

निवडून गेल्यापासून आमदाराची भेट झाली का? कुठली योजना त्यांनी आणली का? कोणती कामे केलीत का? परत गावात आलते का? फोन उचलतात का? कधी सुखदुःखात सहभागी झाले का? असे विविध प्रश्न मतदारांना विचारून पुढे बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मला पहा आणि फुले वहा अशी अवस्था असणाऱ्या निष्क्रिय आमदाराच्या पाठीशी राहायचे की, सर्वसामान्य माणसा सोबत ताटाला ताट लावून जेवण करणाऱ्या सोबत राहायचे हे मतदारांनी ठरवावे. तुम्ही मला साथ द्या, गावातील एकही विकासाचे काम शिल्लक ठेवणार नाही तुमचा स्वाभिमान अभिमान वाढविण्याचे काम केल्याशिवाय राहणार नाही.

गेल्या पाच वर्षात कोणतेच काम केले नसल्याने जनतेत प्रचंड नाराजी असल्याने या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत पराभव होणार हे दिसून आल्याने संपूर्ण देशमुख कुटुंब गावोगाव फिरत आहेत त्याचा काहीही उपयोग होणार नाही लाडक्या बहिणीचा भावाच्या डोक्यावर हात असल्याने भाजपा महायुतीचा विजय आता कोणतीही शक्ती रोखू शकत नाही असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

काँग्रेसच्या काळात तोंड बघून योजना दिल्या जात होत्या मात्र महायुतीच्या शासनाने जो गरजू आहे अशा पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला. या सर्व योजना पुढील काळातही कायम पणे सुरू ठेवण्यासाठी आणि आपली सर्वांची काळजी घेणाऱ्या महायुती शासनाला आशीर्वाद द्यावे. निवडून गेलेल्या काँग्रेस आमदाराला जनतेशी काहीही घेणेदेणे नाही कधी कोणाला भेटत नाही. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या आमदारांनी कुठल्या कामाला किती निधी आणला आणि चार वर्षात मी कोणती कोणती विकास कामे केली हे एकदा जनतेला कळूच द्या दुधाचे दूध आणि पाण्याचे पाणी होऊन जाईल. काँग्रेसच्या भूलथापांना आणि खोट्या आश्वासनाला बळी न पडता येणाऱ्या निवडणुकीत लोक कल्याणकारी, जनहिताच्या योजना करणाऱ्या महायुती शासन पुन्हा सत्तेवर आले पाहिजे यासाठी आपण मला कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून आशीर्वाद द्यावेत असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

## मोदी, शहांचा भाजप संघाला मान्य? ; उद्धव ठाकरेंचा सवाल

रत्नागिरी : प्रतिनिधी ज्यांनी भाजप रुजवला ते लोक आता नको आहेत. भाजपचे अध्यक्ष नड्डा सांगतात की, आम्हाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज नाही. मोदी आणि शहा यांचा हा नवा भाजप संघाला मान्य आहे का, भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांना मान्य आहे का, असा प्रश्न उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रत्नागिरीतील जाहीर सभेत केला. भाजपच्या मतदारांनीही हा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. उद्धवसेनेचे रत्नागिरीतील उमेदवार बाळ माने, राजापुरातील उमेदवार राजन साळवी यांच्या प्रचारासाठी रत्नागिरीतील साळवी स्टॉप येथे उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप तसेच मंत्री उदय सामंत यांच्यावर टीका केली. यावेळी व्यासपीठावर माजी खासदार विनायक राऊत, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार भास्कर जाधव, आमदार राजन साळवी, माजी मंत्री रवींद्र माने, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. आपल्यावर घराणेशाहीचा आरोप केला जातो. मात्र, रत्नागिरी जिल्ह्यात दोन भाऊ निवडणूक लढवत आहेत, सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन भाऊ आणि त्यांचे वडील राजकारणात आहेत. त्यावर कोणी बोलत नाही, असे ठाकरे यांनी सांगितले. यावेळी मंत्री सामंत यांच्यावरही त्यांनी टीका केली. २०१४ साली आयत्या वेळी भाजपने युती होणार नाही, अशी भूमिका घेतली. त्यामुळे उमेदवारी कोणाला द्यावी, असा प्रश्न होता. त्यावेळी उदय सामंत आमच्याकडे आले आणि त्यांना उमेदवारी देऊन मी चूक केली. त्यांना मंत्री बनवण्याचा शब्द दिला आणि तो आपण पाळलाही. मात्र, तरीही ते आपल्याला सोडून गेले, असा आरोप त्यांनी केला.



## लातूरच्या समजदार मतदारांनी विनोद खटकेंच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहावे : लक्ष्मण गायकवाड




लातूर :– लातूरचा मतदार सुजाण, जागरूक आहे. त्यांना चांगल्या –वाईटाची जाण आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवून देऊन लातूरच्या समजदार मतदारांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहावे , असे प्रतिपादन भटके विमुक्त ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष , ' उचल्या' कार लक्ष्मण गायकवाड यांनी बुधवारी लातुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले. भटके विमुक्त ओबीसी महासंघाने खटके यांना जाहीर पाठिंबा दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीकडून लातूर शहर विधानसभा मतदार संघातून व्हीएस पँथर चे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके हे निवडणूक लढवत आहेत. त्यांना आपला जाहीर पाठिंबा घोषित करण्याच्या उद्देशाने लातुरात आल्यानंतर ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण गायकवाड यांनी पत्रकारांशी सुसंवाद साधला. आपण सातत्याने शोषण करणाऱ्यांच्या विरोधात लढा देत आलो आहोत. आजही सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्य मिळालेले नाही. राजेशाही संपली असली तरी राजकारण्यांची घराणेशाही सुरु झाल्याचा आरोप करून लक्ष्मण गायकवाड पुढे म्हणाले की, आपल्या देशात स्वातंत्र्यापूर्वी होत नव्हत्या एवढ्या आत्महत्या आता होताना दिसत आहेत. सगळ्याच गोष्टीत आघाडीवर असणारा मराठा समाज आता ओबीसीच्या आरक्षणाची मागणी करून मसणजोगी, वडार, कैकाडी समाजासोबत यायला तयार झाला आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण दिले गेले तर ते मसणजोगी, वडाराच्या मुलीशी सोयरीक करणार का ? त्यांच्या ताटात जेवणार का ? असा सवाल करून गायकवाड यांनी भारतात एवढे खोटे बोलणारे लोक कधी पाहिले नव्हते,असे बोलून दाखवले. विनोद खटके सामान्य परिवारातून आणि सामाजिक चळवळीतून आलेले उमदे नेतृत्व आहे. त्यांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून आपल्या कार्याची चुणूक लातूरकरांना वेळोवेळी दाखवून दिली आहे. एकवेळ मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांना मुख्यमंत्री करा, पण सामान्यांच्या हिताआड येणाऱ्या गढीवरची देशमुख – पाटलांना हद्दपार करा,असे आवाहन करून त्यांनी लातूरच्या मतदारांनी विनोद खटकेसारख्या उमद्या युवा नेतृत्वाच्या पाठीशी राहावे,असे आवाहन केले. वंचितचे उमेदवार विनोद खटके यांनी आपल्याला भटके विमुक्तांच्या पाठिंबा मिळाल्याने आपली बाजू आणखी मजबूत झाली असून निवडून आल्यास त्यांच्या न्याय मागण्याच्या पूर्ततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू,असे सांगितले. लातूरच्या मतदारांकडून आपल्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आपण ही लढाई नक्कीच जिंकणार असल्याचा विश्वासही खटके यांनी व्यक्त केला. प्रा. मच्छिन्द्र भोसले यांनीही यावेळी मतदारांनी विनोद खटके यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. या प्रसंगी सलीम सय्यद, बाबू शेल्हाळ , रमेश गायकवाड, सोफीभाई सय्यद, आनंद जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## दहावी २००७ च्या बॅचचा विद्यार्थ्यांचा वर्गमित्र स्नेहमेळावा संपन्न

किल्ले धारूर/प्रतिनिधी किल्ले धारूर शहरातील जनता प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील सन २००७ मधील इयत्ता दहावीच्या वर्गमित्राचा स्नेह मेळावा श्री क्षेत्र आंबाचोंडी येथे संपन्न झाला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जनता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंगारे मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव शिंगारे सर,मंत्रे सर, शिंपले सर,गायके मॅडम, उज्वला मॅडम,मिठू सर,अशोक मामा यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी जनता विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले याप्रसंगी महादेव शिंगारे सर यांनी मोबाईलचा होत असलेला अतिवापर व त्यामुळे होणारे बालमनावर परिणाम याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले तसेच त्यांनी दिलेल्या शिक्षणाची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या आयुष्यात पुढे जाव खूप मोठे व्हावे व लोकांना सांगताना मला अभिमान होतो की,हा माझा विद्यार्थी आहे असे सांगताना आम्हाला खूप आनंद होत आहे असे शिनगारे सरांनी म्हटले आहे. सर्व उपस्थित शिक्षक वृंद यांनी त्यांच्या माजी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व जुन्या आठवणींना उजळा देत सर्व माजी विद्यार्थी व शिक्षक हे सतरा वर्षांनी एकत्र आले होते. याप्रसंगी जुने नवे अनुभव सांगत सर्वांच्या डोळ्यांमध्ये आनंद आश्रू आले होते. या स्नेह मेळाव्यासाठी उपस्थित असलेल्या सर्व मित्र मैत्रिणींनी आपापले अनुभव शेअर करून खूप जणांनी त्यांच्या जीवनामध्ये बदल कसा झाला ते आज काय करतात ते उद्या काय करणार आहेत आणि त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या इच्छा काय आहेत यावर सर्वांनी चर्चा केली.



अध्यक्षीय समारोप हा सीमा मॅडम यांच्या मनोगतांनी झाला त्यांच्या मनोगतच त्यांनी म्हटले की,आमचे चेहरे तर तेच आहेत पण आमच्यासमोर बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जे माझे विद्यार्थी होते त्यांचे चेहरे बदललेले आहेत खूप असा बदल झालेला आहे. त्यामुळे जे मला माहित होते ते उन्नाड होते तेच माझ्या लक्षात आहेत बाकी लक्षात नाहीत असे त्यांनी सांगितले म्हणजेच ज्या ज्या गोष्टी त्यांनी शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये पाहिल्या त्या गोष्टी आज या प्रसंगी त्यांना दिसल्या नाहीत. सीमा मॅडम यांना यावेळी एक संस्कारी विद्यार्थी त्यांच्या समोर दिसले खरंच खूप आनंद झाला असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. युवराज फुन्ने यांनी केले तर उपस्थितांचे आभार माधुरी तिबोले यांनी मानले.

## प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या ना.संजय बनसोडे यांना दुसऱ्यांदा संधी द्या : माजी जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर

### ना.संजय बनसोडे यांनी पाच वर्षात लोककल्याणाचे काम केले

उदगीर / प्रतिनिधी :– कोरोनाचे संकट असुनही आपल्या मतदारसंघाची नाळ तुटू न देता मंत्रिपदाची जबाबदारी खांद्यावर असतानाही गेल्या पाच वर्षात हजारो कोटींचा निधी खेचुन आणून उदगीर मतदार संघातील जनतेची एक जनसेवक म्हणून प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या ना.संजय बनसोडे यांना दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजयी करुन पुन्हा एकदा आपली सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर यांनी व्यक्त केले. ते उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ गावभेट दौरा निमित्त उदगीर तालुक्यातील कोदळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, चंद्रकांत वैजापुरे, भरत चामले, प्रवीण भोळे, शिवशंकर धुप्पे, ब्रम्हाजी केंद्रे, प्रकाश राठोड, श्रीधर राठोड, अमोल निडवदे, धर्मपाल नादरगे, धनराज बिरादार, रमेश शेरीकर, डॉ.चंद्रकांत कोठारे, सतिश सुळे महाराज, अजित राठोड, गोपाळ पाटील, शिवशंकर पांडे, राजीव वाघे, लहु कांबळे, प्रकाश सुतार, प्रकाश पाटील, शंकर जाधव, शिवाजी डावकरे, अरुण पटणे, गिरीधर गडीतकर, विशाल सुतार, व्यंकट सुर्यवंशी, वामन जाधव, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना बसवराज पाटील यांनी, महायुती सरकारने सर्वसामान्यांना घरकुलांची योजना दिली. शेतकऱ्यांचे वीज बील माफ केले. महिलांसाठी लाडकी बहिण व मोफत गॅसची योजना आणली. शेतकऱ्यांना विमा कवच दिले. या महायुती सरकारमुळे आपल्या भागाचे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री नामदार संजय बनसोडे यांनी पुढाकार घेऊन आपल्या मतदारसंघात विविध योजनेच्या माध्यमातून विकास निधी खेचून आणला म्हणून येत्या विधानसभेच्या निवडणुकीत आपण सर्वांनी विचार करून तुमच्या हिताच्या माणसाला म्हणजे ना. संजय बनसोडे यांनाच मतदान करा. गेल्या पाच वर्षात मंत्री असूनही ना.बनसोडे यांनी सर्वांशी प्रेमाने वागून अतिशय जिव्हाळ्याचे संबंध तयार केले असुन ते एक सच्चे व चारित्र्य संपन्न उमेदवार असल्याची भावना बसवराज पाटील कौळखेडकर यांनी व्यक्त केली. यावेळी नळगीर सर्कलमधील विविध गावचे सरपंच, चेअरमन, महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## संविधानाला विरोध असणा– यांनी त्याचा रंग ठरवू नये

नागपूर : प्रतिनिधी राहुल गांधी नेहमी संविधान दाखवतात. संविधानाचा सन्मान सर्वांनीच केला पाहिजे, मग लाल संविधान कशासाठी? असा सवाल भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. पण फडणवीसांनी केलेल्या आरोपांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी हे भाजपाची मोठी अडचण आहेत आणि त्यामुळे त्यांना ते घाबरतात. पण जे लोक संविधानाला विरोध करतात, त्यांनी त्याचा रंग ठरवू नये, असा टोलाच पटोलेंनी लगावला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी (ता. ६ नोव्हेंबर) प्रसार माध्यमांशी नागपूर येथे संवाद साधला. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विधानावर उत्तर देत म्हटले की, त्यांनी काय बोलावे हा त्यांचा प्रश्न. नागपुरातील त्यांच्या शक्ती केंद्रावर काय उपक्रम चालतात, हे सर्वांना माहीत आहेत. त्यामुळे ज्या लोकांनी आरक्षणाचा विरोध केला. संविधानाचा विरोध केला, संविधानाला जाळलं त्या व्यवस्थेच्या बाजूला आमच्या काँग्रेसचा कार्यक्रम होत आहे.



दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# मनसेची कोंडी

महाराष्ट्र नवनिर्माण सेना या महाराष्ट्रातील राज ठाकरे यांच्या पक्षाविषयी लोकांच्या आणि मीडियाच्या मनात कायमच कुतूहल राहिले आहे. या विधानसभा निवडणुकीला मनसे हा पक्ष स्वतंत्र अस्तित्व दाखवत स्वतःचा बाणा पुन्हा दाखवण्याच्या तयारीत असेल असे सगळ्यांनाच वाटले होते. पण याही निवडणुकीत मनसेच्या या स्वतंत्र बाण्याची कोंडीच झालेली पाहायला मिळाली आहे.

महाराष्ट्राला काँग्रेसप्रणित आघाडी आणि भाजपप्रणित आघाडी यांच्यापेक्षा काही तिसरा नवीन भक्कम पर्याय मिळाला तर हवा होता. किंबहुना राज्यातील काही मतदार अशा वेगळ्या प्रयोगाला कदाचित साथ देण्याच्या मनस्थितीत होते. त्या दृष्टीने मनसेकडे अनेकांचे लक्ष होते. पण मनसेची स्थिती आज पुन्हा कोंडीत सापडल्यासारखी दिसली आहे. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आपण महायुतीबरोबर सत्तेत बसणार आहोत, असा दावा केला आहे. त्यामुळे त्यांचा पक्ष हा महायुतीतलाच पक्ष म्हणून मतदार जमेला धरणार असतील, तर या पक्षाला आता फार आश्वासक वातावरण असणार नाही अशी चिन्ह आहेत. प्रत्यक्ष प्रचाराच्या आधीच राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत आमचा पक्ष आता सत्तेत असेल आणि महायुतीच सत्तेवर येईल असे जे प्रतिपादन केले आहे त्याचा तपशील बघितला तर असे लक्षात येते की राज ठाकरे यांना भाजपच्या अंगानेच राजकारण करावे असे वाटू लागले आहे. त्यांच्या या भूमिकेचा राज ठाकरे यांना नेमका किती फायदा होतो हे पहावे लागेल. पण जर राज्यातील वातावरण महायुतीच्या विरोधात असेल तर त्या वातावरणाचा मोठा फटका राज ठाकरे यांना बसू शकतो हे सांगण्यासाठी राजकीय जाणकारांच्या प्रतिपादनाची गरज नाही. मात्र, त्याच वेळी मनसे महायुतीच्या सरकाराला पाठिंबा देणार, या राज ठाकरे यांच्या भूमिकेचा महायुतीच्या उमेदवारांना कितपत लाभ होईल याचा अंदाज लागत नाही. ही सगळी भूमिकांची अदलाबदल आणि कोलांट्या सुरू असतानाच महायुतीतलाच एकनाथ शिंदे यांचा पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातच कडाक्याची जुगलबंदी रंगल्याचे पाहायला मिळाले आहे.

माहीमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव निवडणूक लढवत आहेत. अमित ठाकरे यांची ही पहिलीच निवडणूक असल्याने त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे गरजेचे होते. त्यासाठी राज ठाकरे यांनी भाजपच्या साथीने प्रयत्न केले पण त्यांना सदा सरवणकर यांची उमेदवारी आड आली. सरवणकर यांना माघार घ्यायला लावणे हे काही फार आव्हानात्मक काम नव्हते. पण त्यातही राज ठाकरे यांना यश आलेले पाहायला मिळाले नाही. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात गोडीगुलाबीचे संबंध आहेत असे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. त्याचा वापर करून एकनाथ शिंदे यांच्यामार्फत सदा सरवणकर यांना माघार घ्यायला लावणे हे तुलनेने सोपे काम होते, पण हे पडद्यामागचे राजकारणसुद्धा राज ठाकरे यांना समर्थपणे करता आले नाही. आता माहीममध्ये सदा सरवणकर हे अमित ठाकरे यांच्या विरोधात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार म्हणून उभे ठाकले आहेत.

राज ठाकरे यांचे दुर्दैव असे की खुद्द फडणवीस आणि भाजपची साथ असतानाही मुख्यमंत्र्यांचाच पक्ष माहीममध्ये त्यांच्या विरोधात उभा आहे. फडणवीस यांच्यामार्फतसुद्धा सरवणकर यांना खाली बसवता आले असते, तेही मनसेला जमले नाही. राजकारणात बेरीज, वजाबाकी आणि पडद्याआडच्या खेळ्या यांना फार महत्त्व असते. काही वेळेला पूर्ण अनुकूल स्थिती असूनही ती नेमकी जोखता न आल्याने राजकारणात अपयश पदरात पडते. तोच अनुभव राज ठाकरे यांच्या मनसेला वारंवार येताना दिसतो आहे. भाजपच्या मदतीने एकनाथ शिंदे यांना कोंडीत पकडून अमित ठाकरे यांच्या विजयाचा मार्ग सुकर करणे सहज शक्य असताना तिकडे सरवणकर यांनीच राज ठाकरे यांना कोंडीत पकडल्याचे पाहायला मिळाले.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या विरोधातील उमेदवार जर मनसे मागे घेणार असेल तर आपण माहीममधून माघार घेऊ, अशी बेरकी भूमिका सरवणकर यांनी घेतली आणि त्यांनी राज ठाकरे यांनाच चौफेर कोंडीत पकडले. या पार्श्वभूमीवर सध्या निवडणूक प्रचार दौर्‍याला बाहेर पडलेले राज ठाकरे हे अजित पवार आणि एकनाथ शिंदे या महायुतीतल्या महत्त्वाच्या नेत्यांवरच टीका करताना दिसत आहेत. त्यामुळे ते नेमके सध्या कोठे उभे आहेत हे त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांनाच उमगेनासे झालेले आहे. ही स्थिती लक्षात घेतली तर याही निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फार भरभक्कम यश मिळेल असा दावा कोणालाही करता येणार नाही. वास्तविक लोकसभा निवडणुकीत भाजपाला एकतर्फी पाठिंबा देऊन आपले उमेदवार उभे न करण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतल्यानंतर विधानसभेची तयारी करण्यासाठी त्यांना सहा महिन्यांचा अवधी होता. पण त्या अवधीचाही त्यांनी फार लाभ करून घेतलेला दिसला नाही.

जर स्वबळावरच लढायचे होते तर महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या खूप आधीच आपले उमेदवार जाहीर करून त्यांनी निवडणुकीचे रणांगण गाजवायला सुरुवात करायला हवी होती. तेथेही हा पक्ष आणि त्यांचे नेतृत्व कमी पडलेले दिसले. मुळात राज ठाकरे यांच्याविषयी जनतेमध्ये कमालीचे आकर्षण असतानाही आणि त्यांच्याकडे सर्व राज्यभर युवक कार्यकर्त्यांची दमदार फळी असतानाही हा पक्ष केवळ, योग्य वेळी योग्य भूमिका न घेतल्याची फळे भोगताना दिसत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातले एक चांगले नेतृत्व पुन्हा कोंडीत सापडले आहे, असेच म्हणावे लागते.

# कर्करोगाचं निदान करा, हयगय नको !!

जागतिक कर्करोग दिन हा ४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. तसेच जागतिक समुदायाला शिक्षण सुधारण्यासाठी आणि कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात वैयक्तिक, सामूहिक आणि सरकारी कृती प्रज्वलित करतो. जागतिक कर्करोग दिन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या मार्गदर्शनाने साजरा केला जातो. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे हे आहे. तसेच कर्करोगापासून बचाव करता येण्याजोग्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संकल्पना आहे असे मानले जाते.

जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहिती विरोधात जनजागृती करतो, जागरूकता वाढवतो आणि हानी कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापैकीची एक चळवळ म्हणजे छेब्रल्डीशश्रषळश असून, यात लोकांनी स्वतःचे डोके मुंडन करून किंवा तशी आभासी प्रतिमा निर्माण करून ती सोशल मीडियावर प्रगट करण्याची जागतिक चळवळ आहे. यादारे कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी एक प्रकारे मानसिक पाठिंबा दर्शविण्याची ही एक कृती आहे. अशा प्रकारचे जगभरात शेकडो कार्यक्रम घेतले जातात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. जागतिक कर्करोग दिनाचा परिचय हा पॅरिस चार्टरचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो कर्करोग संशोधन, प्रतिबंध, रूग्णांची काळजी, जागरूकता आणि जगभरात एकत्रीकरणाचाही प्रयत्न करतो. संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रुग्ण सेवा सुधारण्यासाठी पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद तयार करण्यात आली होती. त्यामध्ये जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, ज्यावर तत्कालीन युनेस्कोचे संचालक, कोचिरो मत्सुरा आणि तत्कालीन फ्रान्सचे अध्यक्ष जॅक शिराक ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिसमध्ये या समिटमध्ये स्वाक्षरी केली होती.

सोप्या भाषेत सांगायचे तर, कर्करोग हा जगातील प्रमुख मारकांपैकी एक आहे. केवळ या वर्षी, जवळजवळ ९.६ दशलक्ष लोक कर्करोगाने मरतील आणि त्यावर नियंत्रण न ठेवता, २०३० पर्यंत दरवर्षी मृत्यूची संख्या १३.२ दशलक्षपर्यंत वाढेल. प्रतिबंध, शोध आणि उपचार कार्यक्रमांसाठी वाढीव सरकारी मदत आणि निधीमुळे यापैकी बरेच मृत्यू टाळले जाऊ शकतात. कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराला तोंड देण्यासाठी व्यावहारिक धोरणे विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत तर लाखो लोक मरत राहतील. दुर्दैवाने, कॅन्सरमध्ये सर्वात जास्त वाढ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होण्याचा अंदाज आहे, जे रोगाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा सामना करण्यास सर्वात कमी सज्ज आहेत. या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि कर्करोगाचे ओझे कमी करण्यासाठी व्यावहारिक रणनीती विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची गरज आहे. जागतिक कर्करोग दिन हा शब्द पसरवण्याची आणि आंतरराष्ट्रीय मीडिया आणि जागतिक आरोग्य आणि विकास कार्यक्रमांमध्ये या रोगाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्याची योग्य संधी आहे.

जागतिक कर्करोग दिन रन फॉर ए क्युअर आफ्रिकाची आठवण करून देतो की कर्करोग ही जागतिक आणीबाणी आहे आणि आपण प्रत्येकजण या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली भूमिका कशी बजावतो. रन फॉर ए क्युअर आफ्रिकाहा वकिलांच्या मोठ्या समुदायाचा एक भाग कसा आहे, याची साक्ष देणे, आमच्या कार्याला असेच देते. खूप अर्थ आणि आम्हाला कृती करण्यास प्रेरित करते. कर्करोग अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे विकसित होतात आणि शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतात. जागतिक स्तरावर, कर्करोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे, २०२० मध्ये एक कोटीपेक्षा जास्त मृत्यूचे कारण आहे. भारतात, २०२२ मध्ये अंदाजित १९ ते २० लाख प्रकरणे आढळून आली आहेत. तंबाखूचा वापर, दीर्घकाळ मद्यपान, अस्वस्थ अन्न सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि वायू प्रदूषणाच्या संपर्कात येणे हे सर्व कर्करोगाच्या धोक्याचे घटक आहेत. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना अनेक जुनाट आजारांमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या जोखमीला तोंड देण्याचे अनोखे आव्हान आहे. या व्यतिरिक्त या राष्ट्रांनी शिक्षणाचा अभाव, विलंब निदान आणि स्वस्त उपचारांसाठी कमी प्रवेश यामुळे कर्करोगाचे खराब निदान दर्शविले होते. विकसनशील देशांमध्येही, कर्करोगाबाबत जागरूकता नसल्यामुळे निदानास विलंब होतो. २०२० मध्ये नोंदवलेला एक अभ्यास, भारतातील चार प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता, जेथे कर्करोगाचे बहुसंख्य रुग्ण त्यांच्या प्रगत अवस्थेत असतानाच प्रथमच उपचार घेतात. साक्षरता दर आणि कमी उत्पन्नाचा कर्करोग जागरूकतेवर खूप प्रभाव पडतो. भारतात, उच्च उत्पन्न आणि साक्षरता पातळी असलेले लोक इतरांपेक्षा कर्करोगाविषयी अधिक जागरूक होते.

निष्कर्षापर्यंत, भारतीय आणि जागतिक लोकसंख्येमध्ये कर्करोगाची तपासणी, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल सामान्य जागरुकता कमी आहे, विशेषतः कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ज्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि ती भरून काढण्याची तातडीची गरज आहे. योग्य शिक्षणासह कमतरता. जागतिक कर्करोग दिन कर्करोग टाळण्यासाठी, तो लवकर शोधणे आणि उपचार करणे किती महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधते. कर्करोगाचे अनेक प्रकार टाळता येत नसले तरी, काही लोक निरोगी जीवनशैली जगत असले तरीही त्यांना कर्करोगाचे निदान केले जाईल. कर्करोगाचा धोका अनेक मार्गांनी कमी केला जाऊ शकतो. यासह फळे आणि भाज्या जास्त आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आणि लाल मांस कमी असलेले पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम आणि निरोगी वजन राखणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरापासून दूर राहणे

किमान अल्कोहोल सेवन

अतिनील किरणांपासून सावधगिरी बाळगण्यामध्ये सनस्क्रीन वापरणे आणि संरक्षणात्मक कपडे घालणे समाविष्ट आहे. तसेच शिफारस केलेल्या कर्करोगाच्या तपासणीमध्ये नियमितपणे सहभागी होणे, पर्यावरणातील हानिकारक रसायनांचा संपर्क टाळणे, ह्युमन पॅपिलोमाव्हायरस विरुद्ध लसीकरण ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची थीम आहे केअर गॅप बंद करा, जी २०२२ थीमची निरंतरता आहे आणि प्रत्येक वर्षासाठी निर्दिष्ट उद्दिष्टांसह ३ वर्षांची मोहीम चालेल. बहु-वर्षीय मोहिमेमध्ये अधिक एक्सपोजर आणि प्रतिबद्धता, तसेच जागतिक जागरूकता वाढवण्याच्या आणि प्रभाव पाडण्याच्या अधिक संधी मिळतील अशी अपेक्षा होती. एकत्रितपणे आम्ही सत्तेत असलेल्यांना आव्हान देतो. अंतिम वर्ष कर्करोगाच्या प्राधान्याबाबत उच्च अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, असमानतेचा सामना करण्यासाठी सर्जनशील धोरणे विकसित करणे आणि न्याय्य आणि कर्करोगमुक्त जग निर्माण करण्यासाठी संसाधनांचे वाटप करण्यावर भर देतो.

*********

प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# पोटनिवडणुकीत कौल कोणाला?

उत्तर प्रदेशात विधानसभेच्या ९ जागांवर पोटनिवडणूक होत आहे. अर्थातच या सर्व जागांवर मुख्य लढत आहे ती भाजप आणि समाजवादी पक्षामध्ये. काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीने लोकसभेच्या निवडणुकीत संविधान, आरक्षण आणि जातीय समीकरणाचे मुद्दे उपस्थित करून भाजपच्या मार्गात मोठ्या अडचणी निर्माण केल्या होत्या. महत्त्वाचं म्हणजे आघाडीला त्यात यशसुद्धा आले. आता महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुकांसह ४९ आणि लोकसभेच्या २ जागांवर पोटनिवडणूक होत आहे. यात यूपीतील ९ जागांचाही समावेश आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्यापैकी कोण आपली करामत दाखविण्यात यशस्वी होतो? याकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे. योगी आदित्यनाथ यांनी 'बंटेंगे तो कटेंगे'ची घोषणा दिली आहे, तर प्रत्युत्तरात अखिलेश यादव यांनी 'जुडेंगे तो जितेंगे'चा नारा दिला आहे.

भाजपने आता यूपी पोटनिवडणुकीतही हिंदुत्वाच्या खेळपट्टीवर फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. जातीय समीकरण सोडवण्यासाठी भाजप पुन्हा हिंदुत्वाचा अजेंडा वापरणार आहे. हरियाणा आणि जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती भाजपला यूपीच्या पोटनिवडणुकीतही करायची आहे. यूपीच्या नऊ विधानसभा जागांसाठी होणार्‍या पोटनिवडणुकीत भाजपचे केंद्रीय आणि राज्य नेतृत्व हिंदुत्वासह राष्ट्रवादाच्या सूत्राची चाचपणी करणार आहे.

लोकसभा निवडणुकीत यूपीमध्ये अपेक्षित निकाल न मिळाल्याने दुःखी झालेल्या भाजपला पोटनिवडणुकीत हिंदुत्वाच्या जोरावर यश मिळाले तर भाजप हायकमांडकडून २०२७च्या विधानसभा निवडणुकीची रणनीती याच आधारावर तयार केली जाईल. किंबहुना, हरियाणात सलग तिसर्‍यांदा सरकार स्थापन करून आणि २०१४ आणि २०१९ पेक्षा जास्त जागा मिळवून भाजपने सर्व तर्कांचे खंडन केले आहे. त्याचवेळी, भाजपला जम्मू-काश्मीरमध्ये सरकार स्थापनेचा चमत्कार करता आला नसला, तरी तेथे मिळालेल्या मतांनी पक्षाला नवी आशा निर्माण झाली आहे.

२०२४ मधील लोकसभा निवडणुकीचे निकाल म्हणजे भारतीय जनता पक्षाची राष्ट्रीय राजकारणातून पीछेहाट होय, असा प्रचार इंडिया आघाडीकडून करण्यात आला होता. मात्र, यूपी पोटनिवडणुकीत भाजप हिंदुत्व आणि राष्ट्रवादाच्या अजेंड्याला धार देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचा परिणाम राज्यातही दिसून येत आहे. मात्र, भाजपच्या अजेंड्याला तोंड देण्यासाठी काँग्रेस आणि सपानेही तयारी सुरू केली आहे. पोटनिवडणुकीचे राजकारण भाजप आणि सपा यांच्यात जुंपले असतानाच यूपीत आणखी एका विषयाची चर्चा सुरू आहे आणि ती म्हणजे काँग्रेसने पोटनिवडणुकीतून घेतलेली माघार.

काँग्रेसच्या या निर्णयामागे वेगवेगळे तर्क लावले जात आहेत. काँग्रेसच्या मते, इंडिया आघाडीला बळकट करण्यासाठी हायकमांडकडून हा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अखिलेश यादव यांचे ऋण उतरविले, असेही म्हटले जात आहे. हरियाणात निवडणूक न लढवण्याचा राहुल गांधी यांचा सल्ला अखिलेश यादव यांनी मान्य केला होता. याची परतफेड काँग्रेसने यूपीत केली.त्यामुळे काँग्रेसने पोटनिवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला.

लोकसभा निवडणुकीत ३७ जागा जिंकून समाजवादी पक्ष उत्तर प्रदेशातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्याचवेळी काँग्रेसच्याही एका जागेवरून सहा जागा वाढल्या. यानंतर उत्तर प्रदेशातील नऊ विधानसभा जागांवर होणार्‍या पोटनिवडणुकीत काँग्रेस किमान दोन जागा लढवेल, असे मानले जात होते. मात्र, तसे झाले नाही.

उत्तर प्रदेशच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसला पाच जागांवर निवडणूक लढवायची होती. मात्र, अखिलेश यादव यांनी या जागा



सोडण्यास नकार दिला. शिवाय या जागांवर काँग्रेस कधीही मजबूत स्थितीत नव्हती. यामुळे निवडणूक लढवली असती, तर आपल्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली असती याची काँग्रेसला पुरेपूर जाणीव होती. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपसाठी ही पोटनिवडणूक महत्त्वाची मानली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, २०२२च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ४०० जागा लढवल्या होत्या. मात्र, काँग्रेसचे फक्त दोन आमदार निवडून आले. अनेकांची तर अनामत रक्कम जप्त झाली. यावेळी आपण आता माघार घेत सपाला ताकद दिली तर २०२७ मध्ये सौदेबाजी करायला सोपे जाईल अशी धारणा निवडणूक न लढवण्यामागची आहे, अशी चर्चा आहे.

दुसरीकडे भाजपसाठी ही पोटनिवडणूक केवळ महत्त्वाची नाही तर आव्हानात्मक आहे. मुख्यमंत्री योगी यांच्यासाठी आणखी जास्त महत्त्वाची आहे. उमेदवार आपल्या पसंतीचे असतील तर विजय सोपा होतो असा संदेश या पोटनिवडणुकीच्या निकालाच्या माध्यमातून भाजप हायकमांडला द्यायचा आहे. याचा अर्थ, २०२७ मधील विधानसभेच्या निवडणुकीतील उमेदवार हे आपल्याच पसंतीचे असावे, असा संदेश त्यांना द्यायचा आहे, असं म्हटले तरी ते चुकीचे होणार नाही. यूपीतील मतदारांचा मूड २०२४ प्रमाणेच आहे की बदलला हे पोटनिवडणुकीतून दिसून येईल. काँग्रेससमोरचा पेच असा आहे की, राष्ट्रीय राजकारणात त्यांना सपाच्या पाठिंब्याची गरज आहे. आम्ही मैदानातून माघार घेतली आहे, आता सपाने सर्व जागा जिंकाव्यात, असा संदेश काँग्रेसने दिला आहे.

निकाल सपाच्या बाजूने लागला नाही, तर जसे लोकसभा निवडणुकीत एकत्र लढले होते, तसे आताही लढले असते तर चांगला निकाल लागला असता, असे म्हणता येईल. मुळात, भाजपला थांबविण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करण्यास काँग्रेस तयार आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळापासून काँग्रेसने हे धोरण स्वीकारले आहे. यूपीत त्याचीच प्रचिती येते, असे काहींना वाटते. मात्र, पक्षच निवडणूक लढत नसेल तर मग कार्यकर्त्यांनी जायची तरी कुठे? हा प्रश्न निर्माण होतोच.केवळ पुढारी मंडळींनी इशारा केला की मतदान मिळते? असं होत नाही. मायावती आणि अखिलेश यादव यांनी एकजुटीने निवडणूक लढविली होती. राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांनीही मिळून निवडणूक लढविली. मात्र, परिणाम काय झाला हे जगजाहीर आहे.

काँग्रेसने एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती अशी की, काँग्रेसने आज ज्या पक्षांसोबत हात मिळविणी केली आहे त्याच पक्षांनी काँग्रेसचा घात केला आहे. बिहार, बंगाल, महाराष्ट्रात सर्वत्र काँग्रेस जागा सोडत आहे. काँग्रेस आज त्याच पक्षांवर अवलंबून आहे ज्या पक्षांनी काँग्रेसची व्होटबँक कमी केली आहे.

# पालकमंत्री म्हणून सक्षमपणे सांभाळली जिल्ह्याची धुरा कोट्यवधींची विकासकामे, कोविड काळात विशेष काळजी





लातूर : प्रतिनिधी महाविकास आघाडी सरकारच्या काळात जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी जिल्ह्याची धुरा सक्षमपणे सांभाळली. एकीकडे कोरोनाचे संकट असताना रुग्णांची तपासणी आणि तात्काळ उपचाराची सोय व्हावी, म्हणून डेडिकेटेड रुग्णालय सुरू करतानाच शासकीय वसतिगृहे ताब्यात घेऊन तेथे कोविड केअर सेंटर सुरु करून रुग्णांची तपासणी आणि स्वतंत्र उपचाराची सोय उपलब्ध करून दिली. दुसरीकडे लातूर शहर मतदारसंघात विकासकामांचा धडाका लावत भविष्याचा विचार करून शहरात नवीन पाईपलाईन, विलासराव देशमुख शासकीय रुग्णालयात विस्तारीत इमारतीत स्त्रीरोग, प्रसुती, बाल रुग्णालय, गावभागात अत्याधुनिक रुग्णालय, तसेच नवीन जिल्हा रुग्णालयाला मंजुरी दिली. शादिखाना, मुलींसाठी वसतिगृह, वाढत्या वाहनांमुळे विलासराव देशमुख मार्गाच्या माध्यमातून वाहतुकीची सोय यासह शहरातील १८ प्रभाग आणि मतदारसंघातील २८ गावांत रस्ते, शाळा, अंगणवाडी इमारत दुरुस्ती, नवीन बांधकाम, पाणीपुरवठा योजना अशा कितीतरी योजनांतून पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम माजी मंत्री अमित देशमुख यांनी केले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महाविकास आघाडी सरकारमध्ये राज्याच्या वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्रिपदाची धुरा सांभाळताना धोरणात्मक आणि विकासात्मक निर्णय घेऊन राज्याच्या विकासाला चालना देण्याचे काम केले. सोबतच लातूर शहर मतदारसंघात २१०० कोटींपेक्षा अधिक निधी खर्च करून मतदारसंघात विकासकामांना गती दिली. यामध्ये २०५५ पर्यंतच्या पाणी पुरवठ्याचे नियोजन करून शहरात नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी ३५९.२२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आरोग्याच्या दृष्टीने विचार करून विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या विस्तारीत इमारतीत २०० खाटांचे स्त्रीरोग, प्रसुतीशास्त्र आणि बाल रुग्णालयाला मंजुरी दिली. तसेच आरोग्य केंद्र तपासणीला (मोहल्ला क्लिनिक) मंजुरी दिली. शहर सुशोभीकरणाच्या दृष्टीने ग्रीन बेल्ट विकसित केले. तसेच रवींद्रनाथ टागोर गार्डन, महात्मा गांधी गार्डन यासह विविध गार्डनचा विकास केला. भूमिगत गटार, सांडपाणी व्यवस्थापन आणि रस्ते योजनेसाठी ३०५.१९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. राष्ट्रीय स्वच्छ हवा शुद्ध कार्यक्रमअंतर्गत मूलभूत सुविधा, व्हर्टिकल गार्डन, कारंजेसाठी १३ लाख ११ हजार रुपये निधी दिला. यासोबतच १ हजार कोटी रुपये खर्चाच्या नवीन बा वळण रस्त्याचे भूसंपादनही करण्यात आले आणि लातूर शहरात वाढती वाहतूक आणि वाहतूक कोंडीचा विचार करीत विलासराव देशमुख मार्ग विकसित करून लातूरकरांना त्याच तोडीचा पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याचे आणि तो मजूबत करण्याचा निर्णयही पालकमंत्री असताना अमित देशमुख यांनी घेतला. आता या रस्त्याचे मजबुतीकरण सुरू आहे. याशिवाय ओढे-नाले खोलीकरण, दुरुस्ती करून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहासोबतच पाणी झिरपण्याची प्रक्रिया वाढविण्याचा प्रयत्न केला गेला. रुग्णालयात रुग्णांची सोय व्हावी, त्यांना योग्य उपचार मिळावेत, या दृष्टिकोनातून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला तब्बल ५०० कोटी रुपयांचा निधी माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी निधी दिला. महाविद्यालयात नवीन सुसज्ज बा रुग्ण तपासी केंद्र इमारत उभारण्यात आली. मुलामुलींच्या नवीन वसतिगृहासाठी ४ कोटी, अल्पसंख्याक मुला-मुलींना वसतिगृह, ओबीसींसाठी वसतिगृह यासाठीही निधी दिला. उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतक-यांच्या मुलींसाठी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब वसतिगृह उभारण्यात आले. त्यासाठी ७ कोटींची निधी दिला. या वसतिगृहाचे आता लोकार्पणही झाले. याशिवाय सारथी संस्थेच्या उपविभागीय कार्यालयासाठी १७४ कोटी रुपये, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ग्रंथालय, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह मंजूर केले. अद्ययावत शादिखाना उभारणीसाठी १० कोटी ८५ लाखांचा निधी, पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा, आंतरराष्ट्रीय दर्जाची अद्ययावत बाजारपेठ उभारणीसाठी २६० कोटी बेघरांसाठी निवारा केंद्र यासाठी निधी दिला.

२८ गावांत १७० कोटी,
१८ प्रभागांत ३८९ कोटी
२८ गावे, १८ प्रभागांत कामे

लातूर शहर मतदारसंघातील १८ प्रभाग आणि २८ गावांत नियोजनपूर्व विकास योजना राबविण्यात आल्या. लातूर शहरातील १८ प्रभागांत शहर सुशोभीकरण, सौंदर्यीकरण, स्वच्छता, रस्ते विकास यासह विविध प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलली गेली. ग्रामीण भागांत नवीन रस्ते, नाल्यांची बांधकामे, शाळा, अंगणवाडींच्या इमारतींची दुरुस्ती, स्मशानभूमीत सुविधा, पाणीपुरवठा योजना, नवीन ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम, पाणीपुरवठ्यासाठी पाण्याची टाकी पाईप लाईन, नळजोडणी करून पाणीपुरवठा योजना राबवून ग्रामस्थांना स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यात आले. गावांत रस्त्यांचे मजबुतीकरण, सिमेंट कॉंक्रीटीकरण आणि डांबरीकरण करण्यात आले. गावअंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते आणि पेव्हर ब्लॉक रस्ते बांधले. गावअंतर्गत सिंमेट कॉंक्रीट नाली आणि इतर भागात बंदीस्त नाल्यांचे बांधकाम, जि. प. शाळा वर्गखोली बांधकाम, दुरुस्ती, स्वच्छतागृह आदी विकासकामे केली.

अनेक गावांत विद्युत लाईन

मतदारसंघातील अनेक गावांत नवीन विद्युत लाईन टाकली, नवीन रोहित्र बसविले, रोहीत्र क्षमतावाढ केली, आवश्यक पोल बदलले. विद्युतीकरण करून ग्रामस्थांना विद्युत पुरवठा सुरळीत करून देण्यात आला. सांस्कृतिक सभागृह, ग्रामपंचायत कार्यालय इमारत विस्तारीकरण, नवीन गाळे बांधकाम सुविधा उपलब्ध करून दिल्या.

मंदिर विकासाला निधी

माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी पालकमंत्री असताना मतदारसंघातील विविध मंदिरासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे मंदिराच्या सभागृहासोबतच सुशोभीकरणही वाढले. श्री सिद्धेश्वर मंदिर, प्राचीन केशवराज मंदिर, रामिंलगेश्वर मंदिर, जैन मंदिर, प्राचीन गंगादेवी मंदिर, गंगापूर आदी मंदिरांना निधी देण्यात आला. यासोबतच हसरत सुरत शहावली दर्गाच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करून दिला.

महिलांसाठी मोफत सिटी बस सेवा

महिलांना सिटी बसमधून प्रवास मोफत करण्याचा धाडसी निर्णयही लातूरचे तत्कालीन पालकमंत्री अमित देशमुख यांनी घेतला. महिलांना शहरात मोफत प्रवास करता यावा आणि त्यांची गैरसोय दूर व्हावी आणि आर्थिक भुर्दंड बसू नये, याचा विचार करून ही योजना महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आली. ही सेवा अखंडपणे सुरू आहे. याचा फायदा रोज हजारो महिलांना होत आहे. या धाडसी आणि महिलांना लाभदायी ठरणा-या निर्णयाचे लातूरकर नेहमीच कौतुक करतात.

कोविड काळात मोठे काम

२०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले, त्यावेळी अवघ्या ४ महिन्यांत कोविडची महामारी सुरू झाली. त्यावेळी तत्कालीन वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी कार्यतत्परता दाखवून लातूरकरांना अधिक सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या. दोन वर्षांच्या काळात जास्तीत जास्त वेळ लातूरमध्ये थांबून आवश्यक त्या सूचना करून लातूर कोविडमुक्त ठेवण्यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न केले. त्यातच कोरोनाची लागण झाली तर रुग्णांना चांगली सेवा मिळावी, यासाठी विशेष काळजी घेतली. रुग्णांच्या तपासणीसाठी लातूरसह राज्यात तपासणी प्रयोगशाळा वाढविल्या.

डेडिकेटेड रुग्णालय, केअर सेंटरचे कौतुक

लातूर येथे उभारण्यात आलेले सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल कोविड-१९ रुग्णांसाठी ताब्यात घेऊन तेथे कोविड-१९ डेडिकेटेड हॉस्पीटल सुरू करण्याचा निर्णय घेतला. या ठिकाणी ऑक्सीजन प्लांटसह इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या. लातूर येथे समाजकल्याण विभागाच्या वतीने उभारण्यात आलेली सुसज्ज वसतिगृहे अधिग्रहित करून तेथे कोविड सेंटर सुरू केले. लातूरमध्ये कोविडसाठी डेडिकेटेड रुग्णालय आणि केअर सेंटर सुरू करण्याच्या पालकमंत्री अमित देशमुख यांच्या निर्णयाचे राज्यभर कौतुक झाले. राज्यातील २२ लाख लोकांपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा केला. शेतमालाची वाहतूक विक्री व्हावी, यासाठी बारकाव्याने लक्ष दिले. एवढेच नव्हे, तर कार्यालयातून फोन करून रुग्णांशी संवाद साधत त्यांना धीर देण्याचे काम करतानाच रुग्णांना आवश्यक ती मदत देण्याचे कामदेखील या संकट काळात करण्यात आले. त्यामुळे अमित देशमुख यांनी कोविड काळात जी तत्परता दाखविली, ते लातूरकर कदापि विसरूशकतनाहीत.


# निवडणूक निरीक्षक श्री.के.रोहन राज यांची निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने बैठक संपन्न



केज/प्रतिनिधी २०२४ च्या केज विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने केज येथे निवडणूक निरीक्षक श्री.के.रोहन राज यांची निवडणूक खर्चाच्या विषयावर बैठक संपन्न झाली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज विधानसभा सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी निवडणूक निरीक्षक श्री.के.रोहन राज यांनी २३२ केज अनुसूचित जाती विधानसभा संघ अंतर्गत उमेदवार यांच्या निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी २३२ केज विधानसभा मतदार संघ यांच्या कार्यालयात दुपारी ठिक ३-०० वाजण्याच्या सुमारास बैठक घेतली आहे. या बैठकीमध्ये खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या आहेत. उमेदवार यांनी निवडणूकीच्या अनुषंगाने नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या दिनांकापासुन आवश्यक त्या अभिलेखा सह मा.निवडणूक निरीक्षक (खर्च) श्री.के. रोहन राज यांचे शासकीय विश्रामगृह केज येथील कार्यालयात दिनांक ७ नोव्हेंबर २०२४,दिनांक १२ नोव्हेंबर व दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ठिक १०-०० वाजण्याच्या दरम्यान सर्व उमेदवारांना उपस्थित राहण्याबाबत कळविले आहे, सर्व उमेदवार यांना निवडणूक खर्चाचाहिशोब भाग-क,ख,व ग याविहित नोंदवहीमध्ये ठेवणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत, सर्व उमेदवार यांनी दैनंदिन खर्चामध्ये प्रत्येक वस्तुची नोंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच दर पत्रकात नमुद केल्या प्रमाणे नामनिर्देशन पत्र दाखल केल्याच्या दिनांका पासुन ते निवडणूक निकाल लागेपर्यंत खर्च दर्शविणे बाबत सुचित केले, खर्चाचे उपप्रमाणके उमेदवार किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनीधी यांच्या स्वाक्षरीसह खर्च सादर करण्यात यावा, उमेदवार यांनी रक्कम १००००/- रुपये पेक्षा जास्त खर्च असल्यास धनादेशाद्वारे अदाकरावा, प्रत्येक उमेदवार यांच्या कडे निवडणूक कामासाठी स्वतंत्र बँकेचे खाते असणे आवश्यक आहे. व निवडणूकीसाठी होणारा सर्व खर्च हा त्या बँक खातेमधुनच करण्यात यावा, किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनीधी यांनी प्रमाणीत केलेल्या बँक विवरण पत्राची प्रत ही खर्च पथकास तपासणी वेळी सादर करावी, निवडणूक खर्च सादर न केल्यास उमेदवारांना नोटीस देण्यात येईल. ३दिवसात निवडणूक खर्च दाखल न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल,निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी मतदार संघात पथके स्थापन करण्यात आली आहेत, सदर बैठकीस श्री.के.रोहन राज निवडणूक निरीक्षक, तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,खर्च पथकातील सर्व अधिकारी,कर्मचारी आणि मतदार संघातील उमेदवार व त्यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

# केज तालुक्यातील येवता येथील महावितरण कार्यालयाचा गलथान कारभार !



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील येवता येथील महावितरण कार्यालयाचे सबस्टेशनचे गेल्या दहा ते पंधरा वर्षांपूर्वी काम पूर्ण झालेले आहे परंतु सदरील काम महावितरण कार्यालयाच्या निष्काळजीपणामुळे व दुर्लक्ष पणामुळे बोगस झाल्याचे निदर्शनास येत असूनही याकडे वरिष्ठ अधिक कार्य हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. याचा परिणाम सुरुवातीपासूनच सबस्टेशन गावाला असून ओळींबा नसून खोळंबा अशी परिस्थिती या सबस्टेशनमुळे झाली आहे. सदरील सबस्टेशन गावाच्या शेजारी असून गावाला व शेतकऱ्यांना याचा काही सुद्धा फायदा झाल्याचे दिसून येत नाही व शेतकरी वर्गातून या सबस्टेशन विषयी व कर्मचाऱ्याविषयी नाराजीचा सूर निघत आहे. यावेळी आमच्या प्रतिनिधीने सबस्टेशन मध्ये प्रवेश केला असता सदरील ऑपरेटर आपला जीव धोक्यात घालून शिडीवर चढून शेपटीसाठी हँड ग्लोज हातात नसताना देखील हाताला रुमाल गुंडाळून काम करत असल्याचे निदर्शनास आले यावेळी ऑपरेटरची विचारणा केली असता ऑपरेटरने सांगितले की, गेले कित्येक महिन्यापासून हॅन्ड ग्लोज ऑफिसला नाहीत आणि आम्हाला शेतकऱ्यांचे फोन येतात लाईनमॅनचे फोन येतात यावेळी आम्हाला आमचा जीव धोक्यात घालून आम्हाला लाईट चालू करावी लागते. सतत लाईट जाण्याचे कारण या वेळी ऑपरेटरने सांगितले की, ३३ के.व्हि इनकमर बायपास केल्यामुळे हा सर्व धोका होत आहे याला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन जर सर्व सुविधा व लागणारे साहित्य दिलेत तर सबस्टेशन व्यवस्थित चालू शकते नसता अशीच लाईट सारखीच ट्रिप होत राहणार आहे असे बोलताना आपल्या व्यथा स्पष्टपणे बोलून व्यक्त केल्या आहेत. यामुळे महावितरण कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी अधिकारी याकडे खरच लक्ष घालतील का? हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# केज मतदारसंघाचा विकास करण्याची संधी मला द्या-रमेश गालफाडे



केज/प्रतिनिधी केज विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी प्रचारात आघाडी घेतल्याने एकंदरीत चित्र दिसत आहे. रमेश तात्या गालफडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी केज शहरासह मतदारसंघातील खेड्यापाड्यात जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेऊन मतदानाचे आव्हान करीत आहेत.तसेच आजपर्यंत केलेल्या कामासह पुढील काळात केज मतदार संघात विकासाचे व्हिजन काय असेल याबाबत मतदारांशी संवाद साधत आहेत. त्यांच्या या गावभेटीत दौऱ्याला गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून तालुक्यातील मुंदडा- साठे या प्रस्थापितांच्या भुलभुलैय्या कंटाळलेले मतदार आता चेहरा नवा,बदल हवा अशाप्रकारे बोलू लागल्याने विरोधकांचे धाबे चांगलेच दणाणले असल्याचे चित्र दिसत आहे. केज मतदारसंघात मुंदडा -साठे या प्रस्थापितांची सत्ता आतापर्यंत राहिलेली आहे.मात्र तालुक्यातील जनसामान्यांचे प्रश्न या प्रस्थापित मुंदडा-साठेना सोडवता न आल्याने मतदार संघातील जनतेत एक प्रकारे नाराजीचा सुर आहे. त्यातच यावेळी मुंदडा- साठे याना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांनी आव्हान उभे केल्याने निवडणुकीची रंगत वाढली असून याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. रमेश तात्या गालफाडे मागील काही वर्षात केज मतदार संघात राबविलेले विविध सामाजिक उपक्रम तसेच लोकांच्या अडीअडचणी दरम्यान मदतीसाठी धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्याच्याकडे पाहिले जात आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रमेश तात्या गालफाडे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे येथील मुंदडा - साठे या प्रस्थापितांना रमेश तात्या गालफाडे यांच्या उमेदवारीमुळे तडगे आवाहन उभे राहिले आहे. रमेश तात्या गालफाडे यांनी देखील यावेळी प्रस्थापितांना कोणत्याही परिस्थितीत मात द्यायची हा चंग मनाशी बांधून अगोदरच मतदारसंघातील गावोगावी दोन-तीन वेळा पोहचून तगडी यंत्रणा उभी केली आहे. त्यांचा प्रचार अगदी तळागाळात पोहचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी देखील कंबर कसल्याचे पाहायला मिळत आहे. रमेश तात्या गालफाडे यांच्यासह सर्व कार्यकर्ते मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे विचार व मतदारसंघातील पक्षाचा विकासनामा त्याचबरोबर निवडणूक चिन्ह रेल्वे इंजिन हे घराघरात पोहचवत आहेत.मतदारसंघातील गावागावांत जाऊन वैयक्तिक गाठीभेटी घेत आहेत.त्यामुळे केज मतदारसंघात रमेश तात्या गालफाडे यांच्यावर प्रेम करणाऱ्या मतदार व कार्यकत्यांमध्ये वेगळी ऊर्जा निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे.आपला नेता गतीने काम करत असल्याचे पाहून गावोगावी कार्यकर्ते देखील जोमाने प्रचार करत आहेत. या गाठीभेटी दौऱ्यामध्ये ठिकठिकाणी स्वतः उमेदवार रमेश तात्या गालफाडे सहभागी होताना दिसत आहेत. प्रामुख्याने गावागावांतील कार्यकर्ते तसेच मतदारांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता केज मतदार संघातील राजकीय वातावरण मनसेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना अत्यंत पोषक बनल्याचे बोलले जात आहे.एक वेळेस केज मतदारसंघाचा विकास करण्याची संधी मला द्या असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार रमेश गालफाडे यांनी म्हटले आहे.

# केज विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांचा शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश!

## शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी संगीताताई ठोंबरे यांची निवड



केज/प्रतिनिधी केज विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांचा शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश केला आहे. शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी संगीताताई ठोंबरे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीची माहिती कळताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताषबाजी करून आनंद उत्सव साजरा केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, माजी आमदार संगीताताई ठोंबरे या राष्ट्रवादी शरचंद्र पवार यांच्या पक्षाचे प्रांत अध्यक्ष जयंत पाटील व खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संपर्कात गेल्या अनेक दिवसापासून होत्या व त्या पक्षाकडून उमेदवारी देखील मागत होत्या परंतु त्यांना अद्यापही राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवारी दिली नाही. ठोंबरे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता परंतु डॉक्टर सेलचे अध्यक्ष नरेंद्र काळे व खासदार सोनवणे यांनी मध्यस्थी करून प्रांत अध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी चर्चा घडवून आणली होती त्यानंतरच माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी त्यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला होता.

माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले असून दररोज मतदारसंघात मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे व खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संगिताताई ठोंबरे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार संगिताताई ठोंबरे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे पत्र संगिता ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, दिलीप काळे, दिपक शिंदे यांच्यासह संगिताताई ठोंबरे यांचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# बाभळगावच्या प्रिन्सला जो पर्यंत खटकेंचा झटका दाखवणार नाहीत तो पर्यंत लातुरचा विकास होणार नाही

## – वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके


लातूर : बाभळगावपासून हाकेच्या अंतरावर असलेलं मनपा हद्दीतील नगर पांचपीर नगर येथे रस्ते, नाल्या, लाईट आणि पाणी अशा कुठल्याही नागरी सुविधा नाहीत. आणि बाभळगावमध्ये सर्व सुविधा आहेत. कारण तिथे लातूरचे प्रिन्स राहतात. हे कसले आमदार? त्यामुळे मी निवडून आल्यास लातूर शहरातील अशा पाचपीर नगर, मुक्रमनगर, बारकत नगर सारख्या स्लम एरियाचा पाहिले विकास करणार. त्यामुळे येत्या २० नोव्हेबरला ईव्हीम मशीनवर दहा नंबरला असलेले गॅस सिलिंडरचे बटन दाबून प्रस्थापिताना विनोद खटकेंच्या माध्यमातून झटके द्या.. आणि ऐतिहासिक परिवर्तन करा. असे आवाहन लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोदभाऊ खटके यांनी येथे केले. पांचपीर नगर येथे ५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उमेदवार विनोदभाऊ खटके यांच्या कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी विनोद खटके हे बोलत होते. या सभेला मुस्लिम आणि दलित बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर वंचितचे महाराष्ट्र प्रवक्ते





तय्यब जफर, जिल्हाध्यक्ष सलीमभाई सय्यद, सफी सय्यद, शहराध्यक्ष सचिन गायकवाड, सचिन लामतुरे, परवेजभाई सय्यद, युनूसभाई आदींची प्रमुख उपस्थिती होती. विनोद खटके पुढे म्हणाले, भाजप तर आपला खुला शत्रू आहे, पण काँग्रेस हा छुपा शत्रू आहे. त्यामुळे आपल्या न्याय हक्कासाठी आणि सर्वांगीन विकासासाठी वंचित बहुजन आघाडीला विजयी करून इतिहास घडवा. यावेळी वंचितचे राज्य प्रवक्ते तय्यब जफर यांनी सर्व जाती धर्माना सोबत घेऊन चालणारा एकमेव पक्ष आहे वंचित बहुजन आघाडी. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणुकीत ३० जागा मुस्लिमांना दिल्या आहेत. अन्याय सहन केल्याने अन्याय करणाऱ्यांची ताकद वाढते. तथाकतिथ आमदारांना आमची वस्ती दिसत नाही की समस्या दिसत नाहीत. मात्र आमच्या मतांवर ते श्रीमंत झाले. आम्ही घाणीतच जगू लागलो. आता चित्र बदलावं लागेल. त्यासाठी विनोद खटके यांच्या सिलिंडर चिन्हाचे बटन दाबून विजयी करा. असे आवाहन केले. यावेळी सलीम सय्यद यांनी परवेजनगर च्या समस्या अत्यंत पोटतिकडकीने मांडल्या. सभेला महिला पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कर्मयोगी देविदासराव जमदाडे संस्थेच्या शिक्षक पुरस्कारांचे सोमवारी वितरण



लातूर :– कर्मयोगी कै. ड.देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार दिले जातात. सन २०२४ पुरस्कार प्राचार्य प्रशांत घार (लातूर), प्रा. डॉ.राहुल बावगे(नागपूर), प्रा. डॉ.अनिल जायभाये (लातूर), प्रा. डॉ. शिवसांब कापसे(पूर्णा), प्रा.डॉ. शंकर कल्याणे (औराद शहाजनी), प्रा. मेघा पंडित (लातूर), कुमार बंडे (शिरूर अनंतपाळ), राजकन्या गंभीरे (हरंगुळ खू.),:देविदास सांगवे (शिरूर अनंतपाळ), अरुणा बिरादार (खोपेगाव), जाकीर शाकीर अहमद शेख (रेणापूर) यांना जाहीर झाले आहेत. या पुरस्कारांचे वितरण सोमवार दि.११ नोव्हेंबर २०२४ रोजी जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील सभागृहात सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ व्याख्याते व लेखक तथा पुरस्कार निवड समिती प्रमुख डॉ.राजशेखर सोलापुरे आणि जयक्रांती महाविद्यालय लातूरचे प्राचार्य डॉ.श्रीधर कोल्हे उपस्थित राहणार आहेत.

याच कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ड,अजय कलशेट्टी, डॉ. उर्वी नागुरे, वैशाली चापसी, शरद झरे, मधुकर सोनवणे यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ कवी डॉ. संजय जमदाडे यांच्या ११ चारोळी काव्यसंग्रहाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.

तरी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कर्मयोगी कै. ड. देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर व प्रभाकर पब्लिकेशन,लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भटक्या विमुक्तांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य - माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा भटक्या विमुक्तांशी संवाद

लातूर/प्रतिनिधी:– भटके विमुक्त हे या देशाचे रहिवासी आहेत.देशात लोकशाही आहे असे सांगायचे असेल त्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य द्यावे.यासाठी महाविकास आघाडीचे सरकार वचनबद्ध आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले.

लातूर येथील लक्ष्मी प्रयाग मंगल कार्यालयात आयोजित भटक्या– विमुक्तांच्या मेळाव्यात दिलीपराव देशमुख बोलत होते.आ.धीरज देशमुख,यशवंतराव पाटील यांची या मेळाव्यास प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना माजीमंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले की,भटके विमुक्त हेच या देशाचे खरे मालक आहेत.जुन्या काळात इंग्रजांनी बनवलेले कायदे भटक्या विमुक्तांसाठी आज त्रासदायक ठरत असतील तर ते बदलणे सरकारचे काम आहे. त्यासाठी विचारविनिमय करावा लागेल.हा समाज सतत फिरतीवर असतो. समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची आवश्यकता आहे.त्यासाठी आम्ही प्रयत्न करू.या समाजातही गुणवत्ताधारक विद्यार्थी आहेत. अनेक तरुण आहेत.संधी मिळाली तर ते देखील स्वतः च्या क्षमता सिद्ध करू शकतील, असेही ते म्हणाले.




महायुती सरकारच्या कारभारावर टीका करताना भाजपाने मंत्र्यांना विमानाने पळवून नेण्याचा पराक्रम केला. त्यांना कोणाच्याही प्रश्नांचे देणे घेणे नाही.भटक्या विमुक्तांचे प्रश्न सोडवावयाचे असतील तर त्यासाठी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणे गरजेचे आहे. त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता, सावध राहून महाविकास आघाडीला बहुमताने विजयी करा, असे आवाहनही त्यांनी केले.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.धीरज देशमुख म्हणाले की, आपला देश गरीब नसून गरिबांचा आहे.भटक्या विमुक्तांची गरिबी दूर करून त्यांचा विकास करण्यासाठी आपण प्रयत्न करू. असे आश्वासनही आ. देशमुख यांनी दिले.

भटक्या विमुक्त समाजाच्या प्रतिनिधीनी काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी सरकारच्या पारदर्शक कारभाराचे कौतुक करत उमेदवारांना बहुमताने विजय करण्याचा निर्धार व्यक्त केला.

भटक्या विमुक्तातील माती वडार,गोसावी, घिसडी,गाडीवडार, लोहार, वैदु,चंदनवाले, बंडी धनगर,वडार, गोंधळी,कोल्हाटी,बैरागी वासुदेव,नाथ जोगी, डक्कलवार,कैकाडी, डवरी गोसावी,राईंदर आदी जमातीतील नागरिक व प्रतिनिधी या मेळाव्यास आवर्जून उपस्थित होते.

या मेळाव्यास सुधीर अनवले,अभिमान होळ, राजकुमार होळीकर, अतिश चिकटे,गणेश देशमुख,यशवंत पाटील, गोपाळ सरोदे,दादाराव भोसले,ऐरावत भोळे, महादू गायकवाड,बाबू जाधव,हनुमंत भोसा, रामराजे हाके,लक्ष्मण चव्हाण,अशोक झाकणीकर,सदन बर्डे, अकबर अस्वलवाले, भगवान चितोडिया,रमेश साळुंखे,राजाभाऊ राठोड, आदींसह भटक्या विमुक्त जमातीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मंत्री पदाचा उपयोग मतदार संघाच्या विकासासाठी केला – क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

उदगीर प्रतिनिधी :– राज्यात महायुतीचे सरकार हे विविध योजनेच्या माध्यमातून गोरगरीबांच्या दारापर्यंत विकासनिधी पोहोचवीत आहे. आपण गेल्या ५ वर्षात विकासाची गंगा ही मतदार संघात आणली, त्यात महायुती सरकारमध्ये मंत्री म्हणून काम करताना मिळालेल्या मंत्रीपदाचा उपयोग मतदार संघाच्या विकासासाठी केला असल्याचे मत उदगीर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार तथा क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर विधानसभा मतदार संघातील विविध गावात गावभेट दौरा निमित्त बोरताळा तांडा, सोमला काशिराम तांडा, नागलगाव, सुमठाणा, कोदळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते.





यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि.प. सदस्य बसवराज पाटील कौळखेडकर, चंद्रकांत वैजापुरे, भरत चामले, प्रवीण भोळे, शिवशंकर धुप्पे, ब्रम्हाजी केंद्रे, प्रकाश राठोड, श्रीधर राठोड, अमोल निडवदे, धर्मपाल नादरगे, धनराज बिरादार, रमेश शेरीकर, डॉ. चंद्रकांत कोठारे, सुरेश पवार महाराज, सतिश सुळे महाराज, रामलिंग मठपती महाराज, अजित राठोड, प्रदीप पवार, विकास जाधव, गोपाळ पाटील, शिवशंकर पांडे, राजीव वाघे, रत्नाकर बिरादार, जयप्रकाश कापसे, अ‍ॅड.दिपक पाटील, अनिल पवार, संजय जाधव, पंकज राठोड, लक्ष्मण राठोड, गोपी राठोड, बाळु पवार, बिपीन पवार, अंकुश चव्हाण, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, मतदार संघाचा चौफेर विकास केला आहे. त्यात प्रामुख्याने पाण्याचा प्रश्न, रस्ते, वीज व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या. येथील व्यापार उद्योग वाढला पाहिजे यासाठी या भागात रेल्वेचे जाळे वाढण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. या भागात मोठे उद्योग आले पाहिजेत याकरिता विमानतळ उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असून आगामी काळात असे महत्वाचे प्रकल्प पूर्ण करुन, एम.आय.डी.सी. उभारून येथे मोठे प्रकल्प उभारून मतदार संघातील रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहून काम करणार असल्याचे ना. बनसोडे सांगितले. यावेळी विविध गावात ना.संजय बनसोडे यांचे माता भगिनींनी औक्षण करुन विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विविध गावचे सरपंच, चेअरमन, महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


## ज्यांच्या घरावर बुलडोझर चालवला, त्यांना २५ लाख रुपये द्या



नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील बुलडोझर कारवाईबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला असून ज्या व्यक्तीचे घर बुलडोझरने उद्धस्त करण्यात आले त्यांना २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत. या प्रकरणी सरन्यायाधीश म्हणाले की, घर पाडताना कोणतीही प्रक्रिया पाळली गेली नाही. याप्रकरणी कोणतीही नोटीस बजावली नसल्याचे प्रतिज्ञापत्र सरकारनेच दिले आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले की, यूपी सरकारने केवळ ३.६ चौरस मीटरचे अतिक्रमण असल्याचे सांगितले. याचा कोणताही पुरावा तुम्ही दिलेला नाही. नोटीस न देता कुणाचे घर कसे पाडायचे? कोणाच्याही घरात घुसणे म्हणजे अराजक आहे. तुम्ही पीडितेला २५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी. सुप्रीम कोर्टानेही बुलडोझरच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले की, उत्तर प्रदेश सरकारने फक्त ३.६ चौरस मीटरचे अतिक्रमण असल्याचे सांगितले. याचा कोणताही पुरावा तुम्ही दिलेला नाही. नोटीस न देता कुणाचे घर कसे पाडायचे? कोणाच्याही घरात घुसणे म्हणजे अराजक आहे. तुम्ही पीडितेला २५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी. सुप्रीम कोर्टानेही बुलडोझरच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली.

# उमेदवार गोविंद जेठेवाड यांचा आत्महत्येचा प्रयत्न

किनवट/शेख शौकत :–इस्लापूर येथील एका वादग्रस्त भूखंडाच्या आर्थिक व्यवहारातून निराश झालेले रासपाचे किनवट विधानसभा निवडणुकीचे उमेदवार। गोविंद जेठेवाड यांनी आज दुपारच्या सुमारास किनवट येथे विषारी औषध घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला उपस्थितांनी वेळीच याला आवर घातल्याने मोठा अनर्थ टळला असला तरी गोविंद जेठेवाड यांना किनवट येथे प्राथमिक उपचार करून प्रकृती गंभीर असल्याने अधिक उपचारासाठी हलविण्यात आले आहे. आज घडलेल्या या अचानक घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. येथील रासापाचे उमेदवार गोविंद जेठेवाड यांनी मागील काही महिन्यापूर्वी इस्लापूर येथील एक भूखंड इस्लापूर येथील शिवाजी घोगरे आणि किनवट येथील दोन व्यापारी व अन्य एक जण असा ५ जनानी अँडव्हान्स रक्कम महीले कडुन खरेदी केली आणि त्या जमिनीचा आर्थिक व्यवहार केला आणि त्यातील काही रक्कम ऍडव्हान्स म्हणून संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आली होती पण ही रक्कम पूर्ण मिळाली नसल्याने त्या शेतकरी महिलेने शेत ताब्यात देण्यास या भूखंड विक्री करणाऱ्यांना मज्ञाव केला आणि या व्यवहारासंबंधी किनवट येथे हे सर्वजण दुपारी चर्चा करण्यात आली. असताना ज्या ठिकाणी चर्चा सुरू होती त्याच ठिकाणी गोविंद जेठेवाड यांनी माझ्याकडे अजूनही पैसे जमले नाही मी तुम्हाला पैसे देणार आहे पण असा त्रास देऊ नका असे म्हणत चक्क विषारी औषधाचा डब्बा बाहेर काढून तो तोंडात ओतून घेण्याचा प्रयत्न केला असता समोरच्यांनी त्यांना तो डबा हिसकावून घेतला आणि तात्काळ किनवट येथील करण्यात



आले पुढील उपचारासाठी त्यांना आदिलाबाद येथे हलविण्यात आले आहे. या प्रकरणाची सत्यता पोलीसानी शोधल्या नंतर हाती आल्यानंतरच या आत्महत्येच्या प्रयत्नाची गुढ उकलणार आहे दरम्यान शिवाजी घोगरे व अन्य एकाने गोविंदा जेठेवाड यांनी आमच्यासमोर केलेल्या आत्महात्येच्या प्रयत्नाची माहीती किनवट पोलीस स्टेशनला तक्रार ही दिली आहे या घटनेमुळे किनवट शहरात एकच खळबळ माजली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE